# मन

जळते रान,
सर्वांना दिसते।
नुसता माजतो,
...कोलाहल।
जळते मन,
कुणा ही न.. दिसते,
नुसतीच...
घालमेल ॥
हळवं मन....
आतल्या आत झुरते
नसते कुणा किंचितही,
चाहूल...॥
नसते कुणा भान,
वेदना ही नसते....
असतो फक्त...
शब्दच्छल...॥
आपले मन...
जपावे आपण
शांती समाधान...
पावेल ते ॥
जपावे मना...
जपाव्या भावना...
करू आराधना...
ईश्वराची...॥

सौ. शोभा पांडे
(दखळ)